स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

प्रा.डॉ. गणेश भामे
एम्.ए., पीएच् डी.
**संचालक** (अतिरिक्त कार्यभार)

## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१

संदर्भ : रासेयो/२०२६–२७/१४३ दि. ०९/०७/२०२६

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
रासेयो संलग्नित सर्व महाविद्यालये परिसंस्था,
फक्त नाशिक जिल्हा,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

विषय : 'मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम**(SIR)-2026**' यशस्वीपणे राबविण्याकरिता राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थ्यांची नावे स्वयंसेवक म्हणून **Google Spread Sheet** मध्ये नाव नोंदणी करण्याबाबत...

संदर्भ : मा. उपजिल्हाधिकारी तथा उपजिल्हा निवडणूक अधिकारी, नाशिक यांचे क्र. निवडणूक/कावि/सं.क्र.२/२४८/२०२६,नाशिक, दिनांक:०१/०७/२०२६ रोजीचे पत्र

महोदय,

उपरोक्त विषय आणि संदर्भीय पत्रान्वये मा. भारत निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांचेकडून महाराष्ट्रासह एकूण १९ राज्य आणि ०३ केंद्रशासित प्रदेशामध्ये मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनरिक्षण(SIR) कार्यक्रम जाहीर करण्यात आलेला आहे.

त्यानुसार सदर कार्यक्रम यशस्वीपणे राबविण्यासाठी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी(BLO) यांना सहाय्य करण्याकरिता राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी स्वयंसेवक म्हणून नियुक्त करण्यात येणार आहेत. त्यानुषंगाने जिल्हयामधील सर्व मतदार संघामध्ये करावयाच्या तयारीबाबत, विशेष सखोल पुनरिक्षण(SIR) कार्यक्रमाच्या माहितीबाबत तसेच मतदारांमध्ये करावयाच्या जनजागृती व व्यापक प्रसिध्दीबाबत माहिती देण्याकरिता व कार्यक्रम यशस्विरित्या राबविण्याकरिता राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थ्यांची नावे स्वयंसेवक म्हणुन नेमणुक करण्यात येणार आहे.

'मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम(SIR)-2026' यशस्वीपणे राबविण्याकरिता खालील Google Spread Sheet लिंकमध्ये आपल्या महाविद्यालयातील रासेयो विद्यार्थ्यांची त्यांच्या परिसरातील त्यांच्या इच्छेनुसार त्यांना अपेक्षित ठिकाणी स्वयंसेवक म्हणून नावनोंदणी तात्काळ करण्यात यावी.

तसेच याबाबतची माहिती BOD लॉगीनमध्ये NSS - Gov Other Reports - Add New - योजना/उपक्रम निवडा यामध्ये उपक्रमाचे नाव **"मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम(SIR)-2026"** या विषयाची निवड करून सादर करण्यात यावा. **अहवाल सादर करताना 'संक्षिप्त अहवाल/अभिप्राय/टिपणी/प्रतिक्रीया' याठिकाणी सदर उपक्रमाकरिता सहभागी विद्यार्थ्यांची माहिती घ्यावी.** आपल्या माहिती व उचित कार्यवाहीकरिता सोबत मा. जिल्हाधिकारी कार्यालयाचा मेल जोडला आहे. कळावे, ही विनंती.

**Google Spread Sheet** लिंक :

**https://docs.google.com/forms/d/1krD1vvR-yTnF1SBOtMbOnmLeI9L9dHs7PAxv5xRtzec/edit**

संचालक (अतिरिक्त कार्यभार)
राष्ट्रीय सेवा योजना

सोबत : मा. जिल्हाधिकारी कार्यालय यांचे पत्र

*Electoral Literacy for stronger democracy*

# जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी नाशिक यांचे कार्यालय

दूरध्वनीक्र. 0253-2310523 ई.मेल-dydeonashik@gmail.com

निवडणुक तात्काळ

क्र.निवडणूक/कावि/सं.क्र.2/४७४/2026
नाशिक, दिनांक - ०९/०७/2026.

प्रति,
**प्रा.डॉ.गणेश भामे,**
संचालक, राष्ट्रीय सेवा योजना,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
गणेशखिंड रस्ता,
पुणे - ४११००७

**विषय — मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) यांना सहाय्यक म्हणून राष्ट्रीय सेवा योजना (NSS) प्रशिक्षणार्थ्यांची नेमणूक करणेबाबत.**

संदर्भ - 1. या कार्यालयाचे पत्र क्र. निवडणूक/कावि/सं.क्र.2/405/2026 दिनांक 16/06/2026
2. आपले पत्र क्र. रासेयो/2026-27/101 दिनांक 18/06/2026

मा.भारत निवडणूक आयोगाने मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम 2026 (SIR) ची घोषणा केलेली असून त्यानुसार दिनांक 30 जून 2026 पासून प्रत्यक्ष कामकाज सुरु झालेले आहे. या कामासाठी नियुक्त मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) यांना त्यांचे कामात सहाय्य करणेसाठी नाशिक जिल्हयातील NSS प्रशिक्षणार्थ्यांना नियुक्त करणेसाठी संदर्भ क्र.1 नुसार विनंती करण्यांत आलेली होती, त्यानुषंगाने संदर्भ क्र. 2 नुसार त्यास परवानगी देण्यांत आलेली आहे.

त्यानुषंगाने डॉ. गणेश आहेर, जिल्हा समन्वयक यांचेशी संपर्क साधला असता सदर कामासाठी NSS विद्यार्थी उपलब्ध होणेसाठी महाविद्यालयातील संबंधित NSS कार्यक्रम अधिका-यांना विद्यापीठा मार्फत निर्देश मिळणे आवश्यक असल्याचे कळविलेले आहे. या कामाचे नियोजनासाठी सर्व संबंधित कार्यक्रम अधिका-यांची बैठक आयोजित करावयाची आहे. त्यासाठी नाशिक जिल्हयातील NSS योजना राबविणा-या कार्यक्रम अधिका-यांची नांवे या कार्यालयास कळविण्यांत यावी. तसेच या कार्यालयातर्फे मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम 2026 (SIR) आयोजित केलेल्या बैठकीस उपस्थित राहून NSS विद्यार्थी उपलब्ध करुन देणेबाबत सर्व संबंधितांना निर्देशित करण्यांत यावे. ही विनंती.

( डॉ. मधुमती सरदेसाई )
उपजिल्हाधिकारी तथा
उपजिल्हा निवडणूक अधिकारी, नाशिक

d:\bs\new letters (repaired) (autorecovered).docx 597

Scanned with CamScanner